नि.दि.दा. क्र. ३४/२०१५
श्रीधर वि. सुरेश
CNR No.MHWS080004512015

## निशाणी क्र. ३० खाली आदेश
## (पारित दिनांक १५.११.२०२२)

वादीच्या वकीलांनी सदरचा अर्ज प्रकरणात नव्याने मुददा काढण्यासाठी दाखल केला आहे. त्यांच्या कथनानुसार सदरचा दावा उदघोषणेकरिता व कायम मनाई हूकूम मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रकरणात न्यायालयाने मुददे स्थापीत केले आहेत. वादीची अशी कैफियत आहे की, वादी हा अनुसूचित जमातीचा असून त्याअनुषंगाने मुद्दा सदर प्रकरणात काढलेला नाही. त्यामुळे अतिरिक्त मुद्दा खालील प्रमाणे काढण्यासाठी न्यायाच्या दृष्टीने आवश्यक म्हटले.

"Whether sale deed dt. 20.02.2002 is hit by the provision of Schedule Tribe Act?"

०२ सदरचा मुद्दयामुळे न्यायनिर्णय करतांना सत्य बाब समोर येईल. अतिरिक्त मुद्दा न काढल्यास सत्य परिस्थिती न्यायालयासमोर न येता प्रतिवादीचे कधीही भरुन निघणारे नुकसान होईल. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज करुन अतिरिक्त मुद्दा काढण्याची विनंती केली आहे. याउलट प्रतिवादीचे वकीलांनी सदरचा अर्ज कायदेशीर नसल्याचे सांगून प्रकरणात अगोदरच मुददा क्र. ०२ हा स्पष्टरित्या काढलेला असल्याने नव्याने मुददा स्थापीत करण्याची गरज नसल्याचे सांगून सदर अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

**०३** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर प्रकरण दिनांक ०८.०६.२०१५ रोजी नोंदणीकृत झाले असून प्रतिवादी हजर झाल्यानंतर माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.क्र. १६ खाली दिनांक ०३.०४.२०१९ रोजी मुददे स्थापीत केलेले आहेत. त्यानंतर प्रकरण वादीचे पुराव्याकरिता नेमलेले होते. वादीने दिनांक २१.०३.२०२२ रोजी नि.क्र. २६ खाली त्याच्या पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असून वादीचा सरतपास व उलटतपास होणे बाकी आहे.

**०४** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.क्र. १६ खाली एकूण चार मुददे

काढलेले असून पहिला मुददा वादग्रस्त खरेदीखत हे कर्जाच्या सुरक्षेकरिता करुन दिले आहे काय? असा मुददा काढला असून मुददा क्र. ०२ व ०३ हे वादी उदघोषणा व मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहे काय ?  असे काढलेले असून चौथा मुददा आदेश काय असा काढलेला आहे. वादीच्या नि.क्र. ०१ वरील वादपत्रामधील कैफियतचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, पान क्र. ०३ वर ओळ क्र. ०२ व ०४ मध्ये सुध्दा वादी हा अनुसूचित जमातीचा असल्याबाबतचा उल्लेख नमूद असून प्रतिवादीने सुध्दा त्याच्या जबाब दाव्यामध्ये पान क्र. ०२ वर परिच्छेद क्र. ०३ मध्ये वादी हा अनुसुचित जमातीचा असल्याचा मजकूर नाकारला आहे.

**<u>०५</u>** परंतु माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी मूद्दे स्थापीत करतांना वादीने अर्जात कथन केलेला मुददा काढलेला दिसून येत नाही. दोन्ही पक्षांची कैफियत, दाव्याचे स्वरुप आणि खरेदीखताचा व्यवहार बघता वादीने कथन केलेला सदर प्रस्तावीत मुद्दा हा दाव्याच्या मुळापर्यंत जाणारा असल्याने सदर मुद्दा स्थापीत करणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप आणि वादी प्रतिवादीमधील वाद बघता सदर मुद्दा महत्वाचा आणि दाव्याचा गुणदोषावर परिणाम करणारा असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जाच्या अनुषंगाने नि.क्र. १६ खालील मुद्यामध्ये मुदतीबाबतच्या अतिरिक्त वाढ करण्यात येत आहे.

३. दोन्ही पक्षांनी व वकीलांनी सदर बाबीची नोंद घ्यावी.

स्वा/-

( यो.द. कोईनकर)

दिनांकः १५.११.२०२२ दिवाणी नयायाधीश क.स्तर, रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Clerk | : | R.F. Tagad |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 15.11.2022 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 15.11.2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 15.11.2022 |